# 'मंगळसूत्र महोत्सव २०११' चे 'पीएनजी' तर्फे आयोजन

**पुणे, ३ एप्रिल/प्रतिनिधी**

गुढीपाडवा म्हणजे साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक. मंगळसूत्र हे मांगल्याचे, पावित्र्याचे लक्षण आणि 'पीएनजी' हे शुद्धतेचे आणि विश्वासाचे प्रतीक. या तिघांचा त्रिवेणी संगम जुळून आला आहे. 'मंगळसूत्र महोत्सव २०११' च्या निमित्ताने 'पीएनजी'च्या पौड रस्त्यावरील दुकानात अभिनेत्री मृणाल कुलकर्णीच्या उपस्थितीत या महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. यावेळी 'पीएनजी'चे सौरभ गाडगीळ उपस्थित होते.

या महोत्सवात मंगळसूत्रांचे पाचशेहून अधिक प्रकार उपलब्ध आहेत. नेहमीच्या वापरासाठीची मंगळसूत्रे, पार्टीवेअर, पारंपरिक, आधुनिक प्रकारची मंगळसूत्रे यामध्ये उपलब्ध आहेत. चार ग्रॅम ते २०० ग्रॅमपर्यंतचे वजन हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. या निमित्ताने १५ ते ३० एप्रिल दरम्यान मंगळसूत्र छायाचित्र स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले. स्पर्धेत भाग घेण्यासाठी महिला ग्राहकांना मंगळसूत्र परिधान केलेल्या तीन वेगवेगळ्या वेशांमधील छायाचित्रे आपल्या नजीकच्या 'पीएनजी' च्या दुकानात पाठवावी, असे गाडगीळ यांनी सांगितले.या महोत्सवाच्या निमित्ताने जुन्या मंगळसूत्रांवर एक्स्चेंज ऑफरही देण्यात येणार आहे. 'मंगळसूत्र हे प्रेमाचे, मांगल्याचे आणि दोन मनांच्या मिलनाचे प्रतीक आहे. स्त्रीच्या याच मांगल्यपूर्ण अलंकाराचा सन्मान करण्यासाठी मंगळसूत्र महोत्सवाचे आयोजन केले आहे. सर्व स्तरांमधील महिलांना आवडतील अशाप्रकारे मंगळसूत्रांची डिझाईन बनवली आहेत' असे गाडगीळ म्हणाले.

महोत्सवात मंगळसूत्रांच्या मजुरीवर १० ते ३० टक्के आकर्षक सवलत दिली जाणार आहे. हा महोत्सव सहा मे.पर्यंत सुरू राहणार आहे. 'पीएनजी' च्या पुणे व नाशिकमधील सर्व दुकानात हा महोत्सव सुरू असणार आहे. ■